# यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला मंडळ, धुळे

खान्देशातील सेवाभावी विधायक संस्था

एक मायेचा हात...

सोसायटी नोंदणी कायदा: रजि.नं.महा/5102/1999/धुळे मुंबई विश्वस्त कायदा : रजि.नं.एफ 5049/2002/धुळे




सन १९९९ साली यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला मंडळ, धुळे या संस्थेची स्थापना झाली असुन संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असतात. महिला मेळावा, व्यावसायिक शिबिर व इतर सामाजिक उपक्रम घडवून आजगायत संस्थेचे कार्य चालू आहे. भविष्यातील योजना केवळ निवारा नव्हे तर आत्मविश्वास निर्माण करणारे पुनर्वसन प्रकल्प राबविता येतील, असे अत्याधुनिक केंद्र संस्थेला उभारायचे आहे. त्यात मनोरंजन तसेच विरंगुळ्याची साधने, संगणक कक्ष, संगीत कक्ष व इतर सुविधा असणार आहे. तसेच तज्ज्ञांद्वारे समुपदेशनाची व्यवस्था, फिजिओथेरपी उपचार, सुसज्ज व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, हस्तकलेच्या वस्तू, अन्य छोटी उत्पादनांच्या निर्मितीसाठी सुसज्ज कार्यशाळा सुरु करण्याचे संस्थेने व्रत हाती घेतले आहे.

## संस्थेची विधायक कार्ये...

## बालसंगोपन योजना

संस्था शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे अनाथ, निराधार तसेच कैद्यांची व दुर्धर आजारग्रस्त पालकांच्या मुला-मुलींना शैक्षणिक अनुदान म्हणून दरमहा ११००/- रुपये लाभार्थींना मिळवुन देत असते जेणेकरून मुला-मुलींना आपण अनाथ असण्याची जाणीव न होता त्यांनी आपला सर्वांगीण विकास करावा. धुळे जिल्ह्यातुन असे १०० लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ आजगायत मिळत आहे. यामुळे मुला-मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत अमुलाग्र बदल होत आहे.

## श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह, धुळे

२००९ साली अनाथ, निराधार मुला-मुलींना आसरा कसा देता येईल हा विचार मनात आल्याने कुटुंब प्रमुखांशी चर्चा करून तसेच शहरातील विविध मान्यवर व्यक्तींशी चर्चा घडवून धुळे शहरातील देवपूर भागात श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह प्रत्यक्षात साकार करण्यास सुरुवात झाली. कालांतराने संस्थेच्या माध्यमातून बालाजी नगर, साक्री रोड येथे नवीन इमारत उभी करण्यात आली त्या ठिकाणी ज्यांना कसलाही आधार नाही, आई-वडील नाही, समाजातील रुढी-परंपरा यातील फरक माहित नाही. अश्या अनाथ मतिमंद मुलींचे पालन पोषण करून त्यांचे कायमस्वरूपी पालकत्व स्विकारून आजमितीस १२५ अनाथ मुलींचा सांभाळ केला जात आहे. या जगात जन्माला येणारा माणूस चांगले आयुष्य घेऊनच जन्माला येतो असे होत नाही. व्यवस्थित वाढ,विकास आणि शिक्षण प्रत्येकालाच मिळते असंही नाही. जे सदृढ आणि निरोगी असतात ते आपला उत्कृष साधतात पण निसर्गतःच कमी बुद्धिमत्ता मिळालेल्या अपंग किंवा परिस्थितीने गांजलेल्यांना नाकारत त्यांचा तिरस्कार करत ते सरळ त्यांना समाजातून बहिष्कृत करतात बऱ्याच वेळा त्यांचे कुंटुंबही त्यांना नाकारते. नुसता आधार न देता त्यांची चडणघडण, त्यांचे शिक्षण, त्यांचा विकास आणि त्यांच्या निरोगी आयुष्यासाठी दिवसरात्र न थकता एक नवी ओळख त्यांना मिळावी यासाठी प्रयत्न करीत राहणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. दिव्यांग मूल जन्माला आल्याबद्दलचा न्यूनगंड त्यांनी मनातून काढून टाकणे आवश्यक आहे. शिक्षण नाही म्हणून प्रशिक्षण नाही. प्रशिक्षण नाही म्हणून नोकरी नाही, नोकरी नाही म्हणून वैवाहिक जीवन नाही, कुटुंब नाही या साखळीत त्यांचे जीवन अडकून जाते. त्यांच्या आजारपणामुळे त्यांच्या जन्मदात्यांनी आपल्या पाल्याची जबाबदारी जरी सोडली असली तरी संस्थेने अशा मुलींचा विकासाचा ध्यास घेऊन त्यांना बालगृह व कार्यशाळेची सोय उपलब्ध करून दिली आहे. संस्थेत त्यांना विनामुल्य भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था, वैद्यकीय सेवा, व्यावसायिक प्रशिक्षण तसेच बौद्धिक विकास, शिक्षण व संगोपनासाठी विशेष शिक्षक, कला शिक्षक, वसतिगृह अधिक्षक, गृहपाल, निदेशक, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, काळजीवाहक, सफाईगार, मदतनीस, पहारेकरी, स्वयंपाकी इ. कर्मचारी वर्ग कार्यरत आहे.

# श्री संस्कार मतिमंद मुलींची कार्यशाळा, धुळे

'संस्कार' मधील शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या अपंग मुलींच्या चेहऱ्यावरील समाधान बरेच काही सांगून जाते. या मुलींना शिकवतांना कमालीचा संयम आवश्यक आहे. आज शिकवलेली गोष्ट अनेक दिवस शिकवावी लागते. प्रत्येकाचा बुध्यांक वेगवेगळा असल्याने प्रत्येक विद्यार्थ्यासाठी शिकवण्याचे मापदंड वेगवेगळे असतात. आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉक्टर येऊन मुलींची पाहणी करतात. मुलींचा केवळ सांभाळ न करता त्यांच्या बौद्धिक क्षमतेनुसार त्यांना कामे शिकवली जातात. ग्रीटिंग कार्ड तयार करणे, आकाश कंदील तयार करणे, पणत्या तयार करणे, गुढी तयार करणे अशी अनेक कामे या ठिकाणी मुलींकडून करून घेतली जातात. यातून तयार होणाऱ्या वस्तू शहरातील बाजारपेठेत विक्रीसाठी ठेवून त्याद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून या मुलींच्या संगोपनाला हातभार लागत असतो. स्वकष्टार्जित कमाई मिळाल्यानं या मुलींमध्ये एक वेगळ्या प्रकारचा आत्मविश्वास जागृत होताना दिसून येतो. आपणही कुणीतरी आहोत, काहीतरी करूशकतो, ही भावना त्यांना जगण्याचं बळ देते. जे आहे ते स्वीकारुन नविन काहीतरी निर्माण करण्याची जिद्द, उमेद आणि त्याच बरोबर आत्मविश्वास 'संस्कार' आज या मुलींमध्ये निर्माण करत आहे. संस्थेमध्ये प्रवेशित मुली हे महाराष्ट्रातील बाल कल्याण समिती मार्फत येत असतात यावेळी त्यांचे आदेश पत्र, दिव्यांगाचा दाखला, केस हिस्ट्री कागदपत्र, आधार कार्ड, मेडिकल उपचार फाईल. व इतर संबंधीत कागदपत्रांची पडताळणी करून संस्थेत प्रवेश दिला जात असतो.

## संस्थेचे इतर महत्वपूर्ण उपक्रम

- दत्तक योजना मार्गदर्शन
- दुर्धर आजारांचे रोगनिदान शिबीर
- विविध प्रकारची शैक्षणिक मार्गदर्शन शिबीर
- महिला व बालकांच्या समस्या निर्मुलन शिबीर
- रक्तदान शिबीर
- ग्रामीण भागात सॅनेटरी पॅड वाटप व जनजागृती कार्यक्रम

## संस्थेस हवा आपला सहभाग

केवळ मानवतेच्या दृष्टीने समाजातील दुर्लक्षित घटकाकडे आम्ही रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा हे व्रत समजून गेल्या तेरा वर्षापासून कार्यरत आहोत. ज्यांना आपल्या जीवनाचे आकलन होत नाही अशा मतिमंद, अनाथ, निराधार मुला-मुलींच्या जीवनात आम्ही जीवन जगण्याची कला निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. या शिवाय संस्थेतील प्रवेशित मुलींकरिता औषधोपचार खर्च, मुलींचे गणवेश, शालेपयोगी वस्तु, अन्नध्यान्य, भांडी, खेळणी, इमारत बांधकाम व मनोरंजन साहित्य यासाठीही आपण देणगी देऊ शकतात. हया विधायक कार्यात आपणही तन-मन-धना द्वारे सहभागी झालात तर संस्थेला अजूनही खूप काही प्रकल्प राबविण्याचे बळ मिळेल. संस्था आपल्या प्रतिसादाची वाट पाहतेय.

## संस्थेचे संपर्क कार्यालय

**यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला मंडळ, धुळे**
घर नं. 1941 अ, गल्ली नं.5, किसनबत्ती खुंट, धुळे - 424001
संपर्क : 9823499221, 9075004448

**श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह संलग्न कार्यशाळा, धुळे**
बालाजी नगर, हॉटेल महेंद्र समोर, साक्री रोड, धुळे - 424001
संपर्क : 9403719328, 8698608777, 7304177706

**संस्था पॅन नं. : AAATY2144D**

80G REG NO. : AAATY2144DF20217
12A REG NO. : AAATY2144DE20219

संस्थेस मिळणाऱ्या सर्व देणग्या 80G व 12A अधिनियमांतर्गत आयकर मुक्त आहेत.

| Bank Name | A/C. Name | A/C. Num / IFSE Code |
|---|---|---|
| State Bank Of India, Kumar Nagar, Sakri Road, Dhule | Yamunai Shaikshanik V Sanskrutik Mahila Mandal, Dhule | A/C. Num : 35775223379<br>IFSE Code : SBIN0061455 |

सोशल मिडिया:- shrisanskardhule www.yamunai.org yamunaidhule@gmail.com

SKY 9766520702